शुक्रवार दि.२१ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१८६ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# विद्यार्थ्यांसाठी सर्वात मोठी बातमी

# शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू

## शालेय शिक्षण विभागाचा निर्णय;मंत्री दादा भुसे यांची माहिती




लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आगामी शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्न लागू करण्यात येत असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज सभागृहात दिली. आगामी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीला लागावी यासाठी सरकारने हा निर्णय घेतला असल्याचे दादा भुसे यांनी म्हटले आहे. राज्य अभ्यासक्रमाच्या आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संबंधित सुकाणू समितीने देखील मान्यता दिली असल्याची माहिती दादा भुसे यांनी विधान परिषदेत प्रश्नावर लेखी उत्तर देताना दिली आहे.

भारतीय जनता पक्षाचे नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी यासंबंधी प्रश्न विचारला होता. या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले आहे. यानुसार राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. याला सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीत उपलब्ध करून दिली जाणार असून एक एप्रिल पासून नवीन सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याचे उत्तर दादा भुसे यांनी दिले आहे. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या या विषयीच्या चर्चेला उत्तर मिळाले आहे.



## गावातील अंधार कायम-लाईट मीटर बसविण्यास टाळाटाळ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

**गरीबांची आर्थिक लूट**

बिलोली तालुक्यातील मौजे अंजनी गावात नव्याने केबल लाईन बसविण्यात आले आहे त्यामुळे अनेक गोरगरीब नागरिक अंधारात राहण्यास मजबूर झाले आहेत. गरीब कुटुंबांना याचा मोठा फटका बसत आहे. नवीन लाईट मीटर बसविण्यास संबंधित लाईनमन टाळाटाळ करत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अंजनी गावातील अनेक कुटुंबे आधीच आर्थिक संकटात आहेत. त्यातच नवीन वीज कनेक्शन घेण्यासाठी लाईनमन ४ हजार रुपये ते ५ हजार रुपये पैसे वसूल करत आहे परंतु नवीन कनेक्शनसाठी ऑनलाईन पावती फक्त ८७० रुपये असल्याच्या तक्रारी होत आहेत नागरिकांनी वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार अर्ज केले असतानाही त्यांच्या तक्रारींची दखल घेतली जात नाही. अनेक गोरगरीब नागरिकघरात वीज नसल्यामुळे रात्रीच्या वेळी मुलांना अभ्यास करणे कठीण जाते. शिवाय, विजेअभावी रोजच्या गरजा भागवणेही कठीण झाले आहे, असे एका अंजनी गावातील सामाजिक कार्यकर्ता गोविंद पाटील यांनी दैनिक लोकनेता बोलताना सांगितले.यासंदर्भात स्थानिक प्रशासन व वीज वितरण कंपनीने त्वरित लक्ष देऊन नागरिकांना योग्य सुविधा द्याव्यात, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## ना.नितीन गडकरींची दिल्ली येथे भेट घेऊन नांदेड येथील दुध डेअरी ते धनेगाव चौक उड्डाण पुलाच्या प्रश्नावर चर्चा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । सुनील शिंदे**



तुळजापूर ते नागपूर राष्ट्रीय महामार्ग ३६१ हा नांदेड शहरातून जात आहे. मागील तीन वर्षापासून दुध डेअरी ते धनेगाव चौक या मार्गावरील काम उड्डाण पुलासाठी गावकऱ्यांनी बंद पाडले आहे, याचबरोबर नांदेड ते संगारेड्डी हा महामार्ग तयार करण्यात यावा अशी मागणी खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत ना. गडकरींची भेट घेवून या बाबत सकारात्मक चर्चा झाली झाली असल्याचे विश्वसनीय वृत आहे.

गेल्या तीन वर्षापासून तुळजापूर ते नागपूर या राष्ट्रीय महामार्गाचे काम नांदेड दुधडेअरी ते धनेगाव चौक या मार्गावर काम गावकरी आणि शेतकऱ्यांनी बंद पाडले,कारण या राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूने धनेगाव, वसरणी, वाजेगाव आदी गावकऱ्यांची शेती आहे. तसेच या महामार्गालगत मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांनी व्यवसायहीथाटले आहेत. या ठिकाणावरून होणारा उड्डाणपुल हा भिंतीचा होत असल्यामुळे हा अडचणीचा ठरत आहे. यासाठी नांदेड दुधडेअरी ते धनेगाव चौक या दरम्यान होणारा उड्डाणपुल हा खांबामध्ये तयार करण्यात यावा अशी मागणी या गावकऱ्यांनी केली होती. त्यामुळेया महामार्गाचे काम गेल्या तीन वर्षापासून बंद आहे. याबाबत शिष्टमंडळांनी ना. नितीन गडकरी यांची भेट घेवून त्यांना याबाबतची अडचण सविस्तरपणे त्यांच्या कानावर टाकली. ना. गडकरी यांनी या शिष्टमंडळाला सकारात्मक उत्तर देवूनहा प्रश्न लवकरच निकाली काढण्यात येईल असे सांगितले. याचबरोबर या शिष्टमंडळाने नांदेड ते संगारेड्डी याही रस्त्याचे काम हाती घेवून हा रस्ता चार पदरी करण्यात यावा. जेणे करून नांदेड ते हैद्राबाद दळणवळणासाठी सोपे ठरणार आहे. व नांदेड शहर हैद्राबाद शहराशी जोडले जाणार असल्याचे नांदेडकरांना व्यापार व औद्योगिक दृष्टीकोणातून महत्वाचे ठरणार आहे. याबाबतही ना. नितीन गडकरी यांनी हाही महामार्ग चौपदरीकरण लवकरच केले जाईल असा सकारात्मक आश्वासन या शिष्टमंडळातील खा. अशोक चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, माजी आ.अमरनाथ राजूरकर,भाजपा संघटन मंत्री संजय कौडगे,भाजपा वैद्यकीय आघाडीचे राज्यप्रमुख डॉ.सचिन उमरेकर, माजी जि.प. सदस्य मनोहर शिंदे, सरपंच गंगाधर ऊर्फ पिंटु पाटील शिंदे, यांच्यासह अनेकाचा सहभाग होता.

## ग्रामीण पोलीसांनी चोरी व घरफोडीतील सहा चोरट्यांना मुद्देमालसह केली अटक

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नवीन नांदेड । प्रतिनिधी**

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत घरफोडी व चोरीच्या पाच घटनेतील सहा आरोपींना पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाने ३ लाख ८५,हजार मुद्देमाल सह अटक केली असून या कामगीरी बदल जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या सह वरीष्ठ अधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.अटक केलेल्या आरोपी कडुन अन्य चोरीच्या घटना उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अबिनाश कुमार, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत चोरीचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते,

त्या अनुषंगाने ओमकांत चिचोलकर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली वरील नमुद गन्हे शोध पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक १७ मार्च २५ रोजी गोपनीय माहितीचे अधारे वरील नमुद सहा आरोपीतांना ताब्यात घेतले. आरोपीकडे सखोल तपास केला असता आरोपीतांनी ५ ठिकाणी चोरी, घरफोडी केल्याचे कबुल केले. त्यावरुन वर नमुद ५ गुन्ह्यातील एकुण ३लाख ८५ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला अधिक तपासासाठी आरोपीतांस न्यायालयात हजर केले असता दोन दिवसाचा पी.सी.आर मिळाला आहे. गुन्हे शोध पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगौरीचे वरीष्ठांनी अभिनंदन केले आहे .

या प्रकरणी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि बी.ई चव्हाण, पोहेको मोरे, पोहेकों तिडके, पोकॉ भिसे, पोकों कलंदर, पोकॉ शिरगीरे, पोकॉ माळगे, पोकों सिरमलवार यांनी गुन्हा उघडकीस आणला असुन या फिर्यादी बालाजी जाधव ,शेख शादुला, नारायण कापुरे, गंगाधर करंडे, नामदेव हंबर्डे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कलम गुरनं २६४/२०२५ कलम ३०३ ,३०५,३३१ (४) भान्यसं गुरनं ९८७/२०२४ कलम ३१(४ ३०५(९) भान्यसं,गुरनं८१९ /२०२४ कलम ३३१(४), ३०५(९) भान्यसं गुरनं ९६८/२०२४ कलम ३३१(३), ३३१ (४),३०५भान्यसं,गुरंन ६८/२०२५ कलम ३०३ (२ भान्यसं गुन्हा मधील पोलिसांनी पाच क्विटंल सोयाबीन अंदाजे किंमत २०,हजार, दोन पाण्याचे मोटार अंदाजे किंमत दहा हजार,एक सबमरशिबल मोटार दहा हजार ,एक दुचाकी नव्वद हजार,एक पल्सर मोटार सायकल १,२५ हजार व एक टो १,३०,हजार असा एकुण ३,लाख ८५, हजार मुद्देमाल जप्त केला आहे.

या केलेल्या कार्यवाहीचे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, सुरज गुरव,अपर पोलीस अधीक्षक, खंडेराव धरणे,अपर पोलीस अधीक्षक,भोकर,सुशीलकुमार नायक,उपविभागीय पोलीस अधिकारी, यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

## महादेव मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात

लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । प्रकाश कुरेवाड**

मौजे चिकना येथील महादेव मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी भाविक भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन धर्माबाद तालुक्यातील चिकना येथील समस्त गावकरी मंडळी यांनी केली आहे.चिकना येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सप्ताहाचे आयोजन मोठ्या उत्साहात २० मार्च २०२५ रोज गुरुवार पासून सुरू झालेल्या सप्ताहातील कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन होत असुन या कार्यक्रमात पंचक्रोशीतील ह, भ, प, नामवंत कीर्तनकार टाळकरी विणेकरी वादक गायक आपले हजेरी लावून सामाजिक प्रबोधन करीत असुन या भव्य दिव्य अशा या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता (समाप्ती ) दि २७ मार्च २०२५ गुरुवार रोजी काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने होणार आहे तरी या अखंड हरिनाम व ग्रंथाराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह




कार्यक्रमात भाविक भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य संयोजक प्रकाश पा आवरे माजी चेअरमन कामाजी पा गुंडाळे गोविंद पा आवरे साईनाथ पा ढेले केशव पा आवरे पोशाटी जुंगुलवाड गंगाधर पा आवरे दिगंबर पा दुंडे सायना भैरवाड माधवराव पा कदम दिलीप पा आवरे गणेश पा कदम हौसाजी पा ढेले गंगाधर पा आवरे शामराव पा कदम विजय पुशुलवार नागनाथ पा चंदापुरे काल्याचे महाप्रसाद दताहारी धारबा पा आवरे समस्त गावकरी मंडळी चिकना यांनी केले आहे.

## दिपभारती विद्यालयात जागतिक चिमणी दिन साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**




सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन संचलित दिपभारती विद्यालय दानापूर येथे सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कार्यालय भोकरदन व दिपभारती विद्यालय दानापूर यांच्या संयुक्त विद्यमाने २० मार्च जागतिक 'चिमणी दिन 'साजरा करण्यात आला .यावेळी विद्यालयाचे मु. अ. श्री वाय एस गवळी सर वनपरिक्षेत्र अधिकारी पेहरकर साहेब , वनपाल श्री व्हि आर सपकाळ , वनपाल डी डी मुळे ,वनरक्षक एस एम सागरे व वाय के लवंगे ,अन्वर शेख शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व विद्यार्थींनी उपस्थित होते.

## शंकरराव पाटील कुदळेकर यांचे निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । किशनराव गायकवाड**



उमरी तालुक्यातील शिवाजी नगर कुदळा ता. उमरी जि. नांदेड येथील माजी सरपंच पदांवर २५ वर्षे राहिले असुन आणि ४० वर्ष चेअरमन पदावर कार्यरत राहुन, निस्वार्थपणे गावांची व गावातील दलित, मुस्लिम, हिंदू इत्यादी जाती धर्माच्या लोकांची सेवा केलेले व गावातील तरुण पिढीला व्यसना पासून दुर ठेवणारे आणि गोरगरीब जनतेच्या सुखा दुखात धावुन जाऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे जेष्ठ नागरिक शंकरराव तुकाराम जाधव पाटील कुवळेकर (१००) वर्षे यांचे दिनांक १९/०३/२५ रोज बुधवारी दुपारी २.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले असून दि २०/०३/२०२५ रोज गुरुवारी ४ वाजता शिवाजी नगर कुदळा येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. १९२४ साली रोजी शंकरराव पाटील जाधव यांचा जन्म झाला होता आमदार कै बाबासाहेब देशमुख गोरठेकर व कै माजी आमदार बापूसाहेब देशमुख गोरठेकर आणि लोकप्रिय शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांचे ते निकटवर्तीय मीत्र होते. त्यांच्या पश्च्यात पत्नी, ३ मुली, ६ मुले, ८ नातु, ९ नाती , पंतु असा मोठा परिवार आहे. मारोतराव, बाबुराव, गंगाधरराव, निळकंठराव माजी चेअरमन कुदळा व पुंडलिकराव यांचे ते वडील होते.



**भोकरदन जाफराबाद विधान सभा मतदार संघाचे जलसम्राट आमदार संतोष पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून दानापुर येथिल विष्णू सर आढाव, सुधाकर आढाव, यांच्या शेतातिल नाल्यावर सिमेंट बंधारा मंजूर झाल्या मुळे त्या कामाचे पूजन करताना माजी संरपच भगवानराव दळवी, भा .ज .पा कार्यकर्ते भूषण पवार, किशोर आढाव, आदींची उपस्थिती होती (छाया लोकनेता न्यूज नेटवर्क)**

# माझा पुढील राजकिय प्रवास राष्ट्रवादीतच जिल्ह्यात महायुतीचे काम करणार–खतगावकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी | महेश पडोळे**

उमरी येथे माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर याची राष्ट्रवादी कोन्ग्रेस पक्ष प्रवेशा बाबत चि आढावा बैठक पार पडली या बैठकीत बोलताना खतगावकरनी मी कोन्ग्रेस मध्ये राजकीय जीवनाचा ७५ टक्के कार्यकाळ पूर्ण केला कोन्ग्रेस पक्षात मतभेद झाल्यानंतर शाहू फुले आंबेडकरांच्या विचारावर चालणार्या व रोख ठोक व्यक्तिमत्त्व असणार्या शब्दावर चालणारा नेता म्हणून उभा महाराष्ट्र ज्याना राजकारणात ओळखतो असे राष्ट्रवादीचे सर्वे सर्वा राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेण्याचा निर्णय घेतला.या पुढील काळात राष्ट्रवादी कोन्ग्रेस पक्ष जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वाढेल या कडे आपन लक्ष देऊ व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांबरोबरच महायुतीचि ताकत वाढविण्याच काम करू नायगाव विधानसभेत माझ्या सूनबाईचा जरी पराभव झाला असला तरी मी व माझे सर्व कार्यकर्ते राष्ट्रवादी कोन्ग्रेस पक्षात प्रवेश घेत असल्यामुळे नायगाव विधानसभा मतदार संघात माझी आ राजेश पवार यांच्या सोबत कुठलीही राजकीय स्पर्धा राहणार नाही उलट मी व माझे सर्व कार्यकर्ते त्यांच्या खांद्याला खांदा लाऊन महायुतीच् काम करू तेव्हा कार्यकर्त्यांनी कुठलीही कटुता मना त न ठेवता काम करावे उमरी शहराचे व तालुक्यातील ग्रामीण भागाचे खूप मोठ्या प्रमाणात प्रश्न आहेत यात प्रामुख्याने शेतीचे सिंचन उद्योगधंदे बेरोजगारी हे प्रशण राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार आ राजेश पवार यांच्या सहकार्याने पुढच्या काळात



सोडवू आज उमरी तालुक्यात डॉ विक्रम देशमुख यांनी मोठ्या संघर्षातून राष्ट्रवादी कोन्ग्रेस पक्ष वाढविला आहे पुढील काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत राष्ट्रवादी कोन्ग्रेस पक्षाच्या व माझ्या सोबत राष्ट्रवादी कोन्ग्रेस मध्ये येणार्या उमरी तालुक्यातील सर्व कार्यकर्त्याच्या पाठीमागे मी पूर्ण ताकदीनिशी उभा राहीन अशी ग्वाही या वेळी त्यांनी दिली तेव्हा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कुठलीही शंका न बाळगता मोठ्या संख्येने २३ मार्च रोजी होणार्या पक्ष प्रवेश सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन केले या बैठकीस माजी आ ओमप्रकाश पोकर्णा राष्ट्रवादी चे प्रदेश सरचिटणीस वसंतराव सुगावे राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर कदम दत्ताहरी पाटील कावलगुडेकर संदीप मोरे तालुकाध्यक्ष सौ अनिता अनंतवार सयद जफर बालाजी.शिंदे योगेश हेद्रे ज्ञानेश्वर पाटील शिवाजी कटके तुकाराम. पाटील देवानंद वडजे प्रल्हाद जाधव संदीप सुर्यवंशी माधव ढगे रमेश हंबर्डे. प्रभाकर शिंदे साईनाथ आकमवड प्रविण. मठपती सुनील मठपती शहरा अध्यक्ष लक्ष्मीबाई जैस्वाल युवकाचे तालुकाध्यक्ष कैलाश पाटील उपाध्यक्ष बालाजी पवार बूथ कमीटचे अध्यक्ष अविनाश पाटील बालाजी शिंदे शाहीर जंटल संतोष वाघमारे संतोष. आरसेवाड माजी सरपंच गंगाधर शिगळे तालुका उपाध्यक्ष गणेश जाधव हवगिरराव पाटील शहराध्यक्ष महेश पडोळे साहेबराव गायकवाड बेलदार सरपंच गणपत गायकवाड जिल्हा उपाध्यक्ष बालाजी अनेराये रामजी जाधव दिगंबर इंग्ळे रमेश हैबते उमेश नारसनवड इ सह मोठ्या प्रमाणावर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# धनगर समाजाने सामाजिक सुरक्षेसाठी ट्रॉसिटी कायदा लागू करण्याची उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा | इस्माईल महेबूब शेख**

सध्या महाराष्टात धनगर समाजावर प्राणघातक हल्ले, अन्याय, अत्याचाराचे प्रमाण वाढत आहेत, त्या अनुषंगाने धनगर समाजाला सामाजिक सुरक्षेतेसाठी ट्रॉसिटी कायदा लागू करण्याची मागणी ऑल इंडिया धनगर महासंघ नई दिल्ली, शाखा निलंगा व निलंगा तालुका सकल धनगर समाज निलंगाच्या वतीने येथील उपविभागीय अधिकारी निलंगा याना निवेदन देऊन केली आहे.



सन २०१४ च्या लोकसभा, विधानसभा निवडणूक पूर्वी महाराष्ट्रत धनगर समाजाच्या संविधानिक देयक असलेले अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्रभर धरणे, आंदोलन, आमरण उपोषण, रास्ता रोको चालू असताना भाजपाचे स्टार प्रचारक सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेत जर देशात व राज्यात भाजपाचे सरकार आले तर धनगर समाजाच्या आरक्षणाची मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकित अमलबजावणी करू असे आश्वासन दिले.परंतु आतापर्यंत अमलबजावणी झालेली नाही. पण धनगर समाजासाठी अनुसूचित जमातीच्या २२ योजना लागू केल्या आहेत. त्याला अनुसरून सध्या महाराष्टत धनगर समाजावर जीव घेणे हल्ले होता दिसत आहे. दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. कमी होत नाही, सरकार याची गांभीर्याने दखल घेत नाही, हा सर्व प्रकार महाराष्ट्रात सकल मराठा समाज ओ बी सी प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी घेऊन आंदोलन सुरू केले, त्याच वेळी ओ बी सी आरक्षण बचाव समिती कडून आरक्षण वाचवण्यासाठी ओ बी सी मैदनात उतरून अदोलन करताना या आंदोलनात ओ बी सी मध्ये धनगर समाज मोठ्या संख्येने आहे म्हणून आंदोलनात धनगर समाजाचा जास्त सहभाग असल्याने धनगर समाजाला टारगेट करून प्राण घातक हल्ले, अन्याय, अत्याचारात वाढ झाली आहे. दिवसेंदिवस वाढत चालली आहे, कमी होताना दिसत नाही, यासाठी धनगर समाजाच्या सुरक्षेसाठी ट्रॉसिटी कायदा लागू करण्याची मागणी सकल धनगर समाजच्या वतीने मागण्या करण्यात आले. यावेळी झटींग (आण्णा) म्हेत्रे, भगवान वरवटे, मल्हारी पेठकर, नामदेव काळे, युवराज जोगी, चंदर मामा गोजरटे, लक्ष्मण होळकर, प्रकाश गड्डे, बालाजी म्हेत्रे , रघुनाथ वरवटे , बापू वरवटे , कमलाकर बालकुंदे , व्यकट वरवटे , गणपत वरवटे ,शिवराज सूर्यवंशी ,सुरेश बिराजदार आदी सह धनगर समाज बांधाव मोठ्या संख्याने उपस्थित होते.

# ह.भ.प.पंढरी महाराज मिरेवाड हे तिसरी पुण्य सलीला नर्मदा परिक्रमा पूर्ण करून आज कळकावाडी येथे परतणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | गोविंद पा.मोरे**

नांदेड जिल्हाचे भूमीपूत्र तथा किर्तनकार, प्रवचनकार ह.भ.प. पंढरी महाराज मिरेवाड हे दिनांक १५/१२/२०२४ मार्ग शिर्ष शु. पौणिमेला पुण्य सलीला माता नर्मदा पायी परिक्रर्मा करायला सुरुवात केली असून त्यांना आतापर्यंत ३६०० कि.मी. अंतराची पुण्य सलीला नर्मदा परिक्रमा त्यांनी पुर्ण केली. तसेच त्यांनी या मार्गामध्ये पवित्र स्तिर्थ स्थानांचे दर्शन घेतले. तसेच त्यांनी गेली ०२ वर्ष पुण्य सलोला नर्मदा पूर्ण केली आहे. व या वर्षी पण त्यांना पुण्य सलीला नर्मदा परिक्रर्मा करण्याचा तिसऱ्या वेळी योग लाभला आहे. ०४ राज्यातून जाणारा हा परिक्रमा मार्ग आहे. आत्यंत आवघड डोंगराळ प्रदेशातून पायी परिक्रमा पुर्ण करते वेळेस यात निळकंठेश्वर तिर्थ, कुबेर भंडारी, मिठाई लाल, श्रीरामाचे पुत्र लवकुश यांनी रामायण गायलेले ठिकाण तसेच अनुसया मातेने ब्रम्ह विष्णु महेश यांना बाळ बनवलेले ठिकाणचे दर्शन झाले आहे. त्यांच्या सोबत श्री. ह.भ.प. मोहन महाराज सिरसाठ नाशिक, श्री. ह.भ.प. विजय महाराज आंळदी देवाची, ह.भ.प. विठ्ठलराव महाराज जळगाव, ह.भ.प. वैभव महाराज विदर्भ, ह.भ.प. अनिरुध्द महाराज वैद्य जालना हे भाविक सोबत होते. तसेच त्यांनी साडे तीन महिन्याची पुण्य सलीला नर्मदा पायी परिक्रर्मा रंग पंचमी दि. २०/०३/२०२५ एकनाथ शष्ठी रोजी संपन्न होऊन ते आज दिनांक २१/०३/२०२५ रोजी त्यांच्या मुळ गावी कळका वाडी ता. कंधार येथे आगमन होणार. ततपूर्वी महादेव मंदीर येथे आभिषेक होणार व ग्रामवासियामध्ये भक्तीचे आनंदाचे वातावरण असून टाळ मृदंगाच्या गजरात त्यांचे स्वागत होईल. दर्शन सोहळा कार्यक्रम हनुमान मंदीर कळकावाडी येथे आयोजीत केला आहे. महाप्रसाद व कन्या भोजन वाटप होईल. तरी या दर्शन सोहळ्याचा भाविकांनी पुण्य लाभ घ्यावा.





राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष ओबीसी सेलच्या देगलूर तालुका अध्यक्षपदी भास्कर संभाजी शिरेवार यांची नियुक्ती करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.(छाया–मधुकर शिरेवार)

# वाघोलीतील उघडे डीपी बॉक्स ठरताहेत धोकादायक; नागरिकांचा जीव धोक्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली | संतोष कदम**

वाघोली मध्ये विविध ठिकाणी लाईट खांबावरील तारा सुद्धा तुटुन खाली पडल्या आहेत तर वाघोली परिसरातील अनेक भागात उघड्या डीपी बॉक्समुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. महावितरण त्यांच्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे. अनेक डीपींची झाकणे गायब झाल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.परिसरातील धोकादायक स्थितील डीपींची त्वरित दुरस्ती करावी, व बॅरीगेट लावण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



**कचऱ्याच्या विळख्यात अडकले डीपी**

रस्त्याच्याकडेला डीपी बसविण्यात आली आहेत. यातील अनेक डीपीचे झाकण गायब असल्यामुळे अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना याचा सर्वाधिक धोका संभवित आहे. परिसरात लहान मुले खेळत असताना पालकांच्या जिवाला घोरच लागतो. एखादी मोठी दुर्घटना घडण्याअगोदर या डीपींची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली जात आहे. अनेक डीपी व ट्रान्सफार्मर भोवती कचऱ्याचे ढीग साचलेले पहायला मिळतं आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. अनेक भागांत उघड्या डीपीकडे महावितरण सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहे. अनेक डीपींची झाकणे गायब झाल्याने नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे.

**महावितरणचे दुर्लक्ष**

वाघोलीतील अनेक परिसरात अशा अनेक उघड्या डीपी आहेत.याकडे महावितरण कानाडोळा करीत असल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. डीपीही मृत्यूचा सापळा बनली आहे. पीएमटी बस स्टॅन्डच्या पाठीमागील रस्त्यावर उघड्या असलेल्या डीपी शेजारी सतत गर्दी पाहायला मिळते. तसेच, याठिकाणी असलेल्या दुकानांमध्ये ग्राहकांची गर्दी असते. जवळच असलेल्या डीपीमुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शॉर्टसर्किटची भीती**

झाकण नसलेल्या डीपीतून शॉर्टसर्किट होऊन दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे असतानाही या महत्त्वाच्या बाबींकडे महावितरण आणि महापालिकेने दुर्लक्ष केले आहे. डीपींची दुरुस्ती आणि विजेशी संबंधित नादुरुस्त उपकरणाची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. परिसरातील डीपी बॉक्सला झाकण कधी बसवली जाणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.महावितरण विभागाने यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी नागरीक करीत आहेत.

# शिल्पकार राम सुतारांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ही घोषणा केली. ३५ लक्ष, मानपत्र, मानचिन्ह आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालच्या समितीने एकमताने राम सुतार यांच्या नावाची या पुरस्कारासाठी निवड केली.

राम सुतार यांचे वय सध्या शंभर वर्षे आहे. ते अजूनही आपल्या कामात तितक्याच तडफेने व्यस्त आहेत. त्यांनी उभारलेली पुतळे आणि शिल्पाचे जगभरात कौतुक झाले. त्यांना यापूर्वी पद्मश्री पुरस्कारानेही गौरवण्यात आले आहे.

# भारतीय अनुसंधान संस्था पुसा भारत सरकार नवी दिल्ली येथे कुलगुरू डॉ.इंद्रमनी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी दिली भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पाटील**

भारतीय अनुसंधान संस्था पुसा भारत सरकार नवी दिल्ली येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीचे आदरणीय कुलगुरू डॉ.इंद्रमनी सर यांच्या मार्गदर्शनाखाली व सेंद्रिय शेतीचे समन्वयक डॉक्टर आनंद गोरे सर यांच्या नियोजना खाली महाराष्ट्रातील ०९ शेतकऱ्यांनी दिली भेट त्यावेळी एटिक येथे शेतकरी व बीज उत्पादनामध्ये नवनवीन बियाणे विकसित करणारे शास्त्रज्ञ डॉक्टर एन वी कुंभारे सर यांच्यासोबत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी दोन ते अडीच तास मीटिंग हॉलमध्ये संवाद साधला त्यावेळी अनेक नवनवीन मोहरी गहू आंबा लिंबू मोसंबी गोभी भाजपाला सर्व बियाण्या विषयी सविस्तर संवाद साधला व नवनवीन विकसित केलेल्या बियाण्यांच्या लागवडी खालील प्लॉटला भेटी दिल्या व उन्हाळी हंगामामध्ये येणारे भाजीपाल्याची बियाणे ही शेतकऱ्यांना लागवडीसाठी भेट दिले त्यावेळी डॉ .कुंभारे सर यांनी महाराष्ट्रातील



शेतकऱ्यांना खूप समजून तेथील वातावरणावर तेथील बियाण्यावर सखोल मार्गदर्शन केले काही बियाणे थंड प्रदेशात उत्पादन देणारे आहेत त्यामुळे महाराष्ट्र हा दमट वातावरणाचा भाग आहे म्हणून दिल्ली ,उत्तरप्रदेश, मध्येप्रदेश या भागातील काही वाण महाराष्ट्रामध्ये प्रतिसाद देत नाहीत असेही सरांनी सांगितले त्यावेळी शेतकऱ्यांसाठी उभारण्यात आलेल्या एटीक मार्केट शेतकऱ्यांच्या स्वतः पिकवणे आणि स्वतः विकणे तेथील बाजारपेठेला भेट दिली आणि तेथील शेतकऱ्यांशी चार तासाच्या जवळ जवळ संवाद साधला अनेक गोष्टी सर्व शेतकऱ्यांना समजल्या आपल्याही महाराष्ट्रामध्ये असे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून दिली तर नक्कीच शेतकरी पिकवतील आणि खपवतील हे शेतकऱ्यांना कळाले आणि दिल्लीतील राहणारे कर्मचारी नागरिक मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांचा माल खरेदी करण्यासाठी त्या मार्केटमध्ये येत होते आणि शेतकऱ्याच्या एमआरपीप्रमाणे घेऊन जात होते व शेतकऱ्यांचे मार्गदर्शक आदरणीय डॉ.कुलगुरू इंद्रमनी सर यांचं स्वप्न आहे मराठवाड्यामध्ये आशा प्रत्येक जिल्ह्यामध्ये बाजारपेठा तयार करण्याचे आणि कुलगुरू मार्गदर्शक इंद्रमनी सर भारतातील सर्व कुलगुरू पैकी सर्वात कार्यसम्राट म्हणून ओळखले जातात केंद्र सरकारचा आणि सरांचा खूप जवळीक संबंध आहे त्यामुळे शेतकऱ्यांना आशा आहे की लवकरच मराठवाड्यामध्ये विकेल ते पिकेल बाजारपेठ तयार होईल आणि आमच्या कुलगुरू साहेबांचं स्वप्न पूर्ण झालं म्हणजे आमचेही स्वप्न पूर्ण होईल व कुलगुरू साहेबांनी परिषदेमध्ये असंही सांगितलं की परिषद ही परिषद राहिली नाही पाहिजे त्याचं रूपांतर शेतकरी शास्त्रज्ञ संवादामध्ये झालं पाहिजे म्हणून सरांनी आम्हाला ५० ते ६० उत्तर प्रदेश येथील शेतकऱ्यांशी व आंतरराष्ट्रीय १८ देशातील शास्त्रज्ञांची भारतातील १०० च्या वर शास्त्रज्ञा सोबत संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून दिली शेतकरी कधीही उत्तरप्रदेश येथे गेले तर त्या भागातील शेतकरी संवाद साधण्यासाठी आणि तेथील नवनवीन प्रयोग याबद्दल माहिती देण्यासाठी सज्ज आहेत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील टीमने आमचा दहा दिवसाचा आंतरराष्ट्रीय परिषदेचा दौरा खूप मेहनत घेऊन यशस्वी केला त्याबद्दल सर्व शेतकऱ्यांकडून सर्व टीमचे अभिनंदन करून आभार मानले आहेत.

# कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांना आत्महत्येची वेळ का यावी?–प्रा.प्रभाकर साळेगावकर (प्रसिद्ध कवी)

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**



आपण म्हणतो की भारत देश हा कृषीप्रधान देश आहे पण या कृषीप्रधान देशात आणि साऱ्या जगात अन्नदाता असलेला शेतकरी रात्रंदिवस काबाडकष्ट करून मिळवलेल्या उत्पन्नातूनच मानवी जीवनाचे मूलभूत गरजा भागतात अशा कष्टाळू व मेहनती शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ का यावी असा प्रश्न मराठवाडा कृषी ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. प्रभाकर साळेगावकर यांनी उपस्थित केला. साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमात त्यांच्या कवितांच्या माध्यमातून प्रभावी भाषण दिले. त्यांच्या कवितांमधून समाजातील विविध विषय,मानवी भावना आणि जीवनाच्या तत्त्वज्ञानावर भाष्य करण्यात आले. श्रोत्यांनी त्यांच्या कवितांच्या आशयपूर्ण शब्दांना आणि प्रभावी सादरीकरणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.त्यांच्या काव्यात्मक शैलीमुळे भाषण अधिक भावनिक व प्रभावशाली झाले. त्यांनी आपल्या कवितांमधून समाजातील वास्तव, सांस्कृतिक महत्त्व आणि मानवी जीवनातील संघर्ष अधोरेखित केले. संमेलनातील रसिक प्रेक्षकांनी त्यांच्या शब्दसामर्थ्याला भरभरून दाद दिली.

उमरी तालुक्यात ज्यांचं सामाजिक राजकिय शिक्षण क्षेत्रात अगदी अभ्यास पूर्ण काम आहे, असे गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा संमेलन स्वागताध्यक्ष डॉ.विक्रम देशमुख तळेगावकर यांनी आपले वडील स्व.श्रीधरराव देशमुख यांच्या स्मरणार्थ मराठवाडा कृषी ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाची सुरुवात केली हे साहित्य संमेलन १८ मार्च रोजी उमरी येथे गिरीष देशमुख इंग्लिश स्कूल येथे संपन्न झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक त्यांनी केले उमरी तालूका अध्यात्मिक व वाङ्मयाने नाहून निघालेल्या आहे अशा तालुक्यात साहित्य संमेलन होणे अत्यंत आवश्यक आहे या मुळे नव युवकाना साहित्याची ओढ लागेल व हे तरुण साहित्यिक होण्यासाठी प्रयत्न करतील या हेतूनेच या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.महाराष्ट्रात आजही ग्रामीण भागात गाव स्वच्छता झालेली नाही. प्रत्येक घरात शौचालयाचा वापर झालाच पाहिजे शौचालय न वापरल्यामुळे कसे गाव अस्वछ आणि घर कसे आजरास बळी पडते याची सविस्तर माहिती संमेलनाचे उदघाटक राज्याचे ग्राम स्वच्छता समितेचे मा.अध्यक्ष मा.माधवराव पा.शेळगावकर यांनी समजावली. यावेळी संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना कैलासवासी राजेश देशमुख तळेगावकर यांच्या स्मरणार्थ कै. आर.आर.पाटील या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्यामध्ये आरोग्या क्षेत्रात उत्कृष्ट सेवा बजावणारे डॉ.सुरज जाधव, कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन करणारे श्री. साहेबराव पाटील शिंदे, प्रशासकीय सेवेत कार्यतत्पर असणारे श्री.महेश खदगाये उमरी तालुक्यात अध्यात्माचे वेड लावणारे अध्यात्मिक ह.भ.प.गंगाधर होंडाळे, साहित्य प्रेमी प्रा.शिवाजी जोगदंड, उमरी तालुक्यात शिक्षण क्षेत्रात उत्तम कार्य बजावणारे श्री.सतीश पाटील निमटेक कर यांना उपस्थित प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते पुरस्काराने गौरविण्यात आले. सा. प्रभात वार्ता संमेलन विशेषशांकाचे विमोचन करण्यात आले. साहित्य संमेलनाची सुरुवात नगरपरिषद उमरी कार्यालय येथून संमेलनाध्यक्ष साळेगावकर, बापु दासरी, ग.शि.अ.नंदकुमार कुलकर्णी, शि.वि.अ.बेळकोणे सर यांच्या उपस्थितीत ग्रंथ दिंडी व शोभायात्रे ने करण्यात आली. उमरी शहराच्या मुख्य रस्त्यावरून ही शोभायात्रा लेझिम पथक, वारकरी, विविध देखावे ने मार्गस्थ होत उमरी शहराच्या मध्यवर्ती भागातील छ. शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून शाळेत पोहचली. त्यानंतर उदघाटन सोहळा व सत्कार सोहळा संपन्न झाला.साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात कवी संमेलन अध्यक्ष पदी प्रसिद्ध कवी बापु दासरी हे होते पंडित पाटील, व्यंकट अनेराये, नारायण खानसोळे, विलास कोळनूरकर, ज्ञानेश्वर गायकवाड, सौ. राजश्री विभुते आदी जणांनी सुरेख कविता सादर केल्या. सौ.स्वाती कान्हेगावकर यांनी शेवग्याचे झाड ही कथा सादर केली. या साहित्य संमेलनास प्रमुख उपस्थिती नांदेड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, रा.काँ.चे प्रदेश सरचिटणीस अँड.भाऊसाहेब गोरठेकर, व्ही.पी.के.उद्योग समूहाचे अध्यक्ष मारोतराव कवळे, श्री.गोविंदराव सिंधिकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर सावंत, जि.प.चे मा. सदस्य आनंदराव यलमगोंडे, केमिस्ट असोसिएशन चे तालुका अध्यक्ष तथा संस्था सचिव प्र. शंकरराव देशमुख, कंधार तालुकाध्यक्ष मनोहर भोसिकर, रा.कॉ.प्रदेश सरचिटणीस गजानन पापटवार, भाजपाचे युवा नेते बापूसाहेब कौडगावकर भाजपाचे विद्यार्थी जिल्हा अध्यक्ष अमोल ढगे, राष्ट्रवादीच्या जिल्हा कार्याध्यक्षां सौ.संध्या शिंदे, मा. प्राचार्य एस. एस. जाधव सर, लामकानिकर सर,पारस सेठ दर्डा डी.आर.सी.यु मेंबर, श्रीनिवास अनंतवार,सतीश देशमूख, विश्वजित देशमूख, ज्ञानेश्वर पा. कदम, संचालक बाबुराव खतगाये, तालुकाध्यक्ष रा.काँ. पार्टी, खयास बेग मोगल, रामू रेडी कप्पावार,व्यंकट पा. ढगे आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन बाजीराव पठाडे, तिजारे के.ए., रमेश हैबते, नागोराव डोंगरे यांनी केले तर आभार सुधाकर पवार यांनी मानले कार्यक्रम यशस्वी ते साठी गोदावरी शिक्षण संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लोणीकंद पोलीसांनी हवेत गोळीबार करणाऱ्या पाच युवकांना केले जेरबंद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**



पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या लोणीकंद ( ता. हवेली ) जि. पुणे येथील पोलीस अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी वैयक्तीक वादाच्या कारणावरून वाडेबोल्हाई येथे झालेल्या भांडणाच्या कारणावरून दहशत निर्माण करून हवेत गोळीबार करणाऱ्या पाच युवकांना मोठ्या शिताफीने अटक केली असल्याची माहिती लोणीकंद पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सर्जेराव कुंभार यांनी दिली.अजित महादेव जाधव ( वय २६, रा. बकोरी ) व गणेश संजय चौधरी ( रा.वाडेगाव ) या दोघांमध्ये वैयक्तीक कारणावरून भांडण झाले.त्यांच्या सहकाऱ्यांनी हवेत गोळीबार केला.या प्रकरणी लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.गणेश संजय चौधरी ( वय २९, रा. वाडेगाव ) ओंकार अंकुश लांडगे ( वय २५, रा. वाडेगाव ) दत्तात्रय भरत गाडे ( वय २५, रा.बोरीभडक ) प्रताप अंकुश अडसुळ ( वय २२, रा.उरुळीकांचन ) महेंद्र दत्तात्रय गाडे ( वय २३, रा. उरुळीकांचन ) अशी अटक केलेल्या युवकांची नावे आहेत.वरील पाच जणांना सात दिवसाची पोलीस कस्टडीची रिमांड घेवून नमुद आरोपींकडून गुन्हा करण्यासाठी वापरलेले १अग्निशस्त्र १जिवंत काडतुस,एक चार चाकी वाहन,तीन दुचाकी वाहन असा एकुण ५ लाख ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सर्जेराव कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र गोडसे यांना सदर गुन्हा उघडकीस आणण्याच्या योग्य त्या सुचना दिल्या.गोडसे यांनी दोन पोलीस पथकाच्या मदतीने उरुळीकांचन ,यवत, दौंड परिसर पिंजून काढून आरोपींना जेरबंद केले.सदरची कामगिरी श्री.मनोज पाटील,अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे,श्री. हिम्मत जाधव पोलीस उपायुक्त परीमंडळ ४,श्रीमती प्रांजली सोनवणे सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.सर्जेराव कुंभार,वरिष्ठ पोलीस निरीक्षक लोणीकंद पोलीस ठाणे ,सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र गोडसे, पोलीस अंमलदार अजित फरांदे,कैलास साळुंखे , स्वप्नील जाधव ,सागर जगताप,अमोल ढोणे, शुभम चिनके ,मल्हारी सपुरे,सुधीर शिवले,गणेश दळवी यांनी केली आहे.

# कर्तव्यदक्ष इन्स्पेक्टर अहिलाने यांची सेंद्रिय शेती व गांडूळ खत प्रकल्पाला भेट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । संतोष पा.जाधव**

लोहा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष इन्स्पेक्टर अहिलाने साहेब यांनी दिली सेंद्रिय शेतीला भेट गांडूळ खत युनिट ची केली पाहणी तीन एकर क्षेत्रावरील सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या टरबूज पिकाची ही पाहणी केली अहिलाने साहेबांनी पूर्ण शेतीला फेरफटका मारला आणि सेंद्रिय शेती काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले प्रत्येक शेतकऱ्यांनी एकत्रित कुटुंब पद्धतीचा अवलंब करून रत्नाकर पाटील यांच्यासारखे गट शेतीकडे वळण्याची गरज इन्स्पेक्टर साहेबांनी व्यक्त केले आणि म्हणाले तुमच्या कुटुंबाची एकत्रित राहणीमान पाहून मला खूप आनंद वाटला आणि तुमच्या कुटुंबाचा आदर्श इतरही शेतकऱ्यांनी घेऊन गांडूळ खत, लाल कंधारी गाई गुरे सेंद्रिय खत निर्मिती नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब परिसरातील शेतकऱ्यांनी करावा असेही साहेबांनी आव्हान केले आणि शेतामधील पिकवलेल्या गावरान वांग्याचे भरीत आणि पिठलं भाकरी निसर्गरम्य वातावरणामध्ये आनंद घेतला यावेळी रत्नाकर पाटील यांच्या कुटुंबातील सर्व तेरा भाऊ पाच चुलते व सुदाम पाटील ढगे मदन पाटील ढगे संभाजी पाटील ढगे गंगाधर पाटील ढगे व्यंकटराव ढगे माधव ढगे केशव ढगे भुजंग अच्युत ढगे उत्तम ढगे सर्व सदस्य उपस्थित होते.

# कुंडलवाडी येथे राज्यस्तरीय फिट इंडिया मरेथॉन स्पर्धेच्यां आयोजन

## कुडेलेश्वर मॉनिग वॉक ग्रुपचा नाविन्यपूर्ण उपक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी । गंगाधर दुसलवाड**

कुंडलवाडी येथील शहरात राज्यातील फिट इंडिया मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन दिनांक २३ रोजी करण्यात आले आहे या स्पर्धेत हजारों सहभागी हावे असे आवाहन कुंडलेक्षर मॉनिग वॉक ग्रुपचा वतीने आयोजित करण्यात आले आहे.

कुंडलवाडी शहर परिसरातील नागरिका शारीरिक दुष्टया सक्षम तंदुरुस्त हावे व सामाजिक एकता पस्थपित हावी या अनुषंगाने कुंडलेक्षर मॉनिग ग्रुपच्या वतीने ५किमी अंतर धावण्याची राज्यातील एकता दौड स्पर्धा आयोजित करण्यातही आले . सदरील स्पर्धा ही दिनांक २३ रोजी सकाळी ६वाजता महात्मा बसेश्वर चोक चुंगी नाका येथे आयोजित करण्यात आले आहे . या स्पर्धेत १५वर्षाच्या वरच्या स्पर्धाकान संधी देण्यात आली आहे .या स्पर्धेत प्रथम क्रमांक ५००१ रुपये स्मृतिचिन्ह , सुवर्ण पदक , प्रमाणपत्र द्वितीय क्रमांक ३००१ रुपये स्मृतिचिन्ह , रजत पदक प्रमाणपत्र, तुतीय क्रमांक २००१रुपेय स्म्रूतिचनह , कांस्यपदक , प्रमाणपत्र असे बक्षीस देण्यात येणार आहेत तर स्पर्धा सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे .या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किशोर गरुडकर जेलस , माऊली कृषी सेवा केंद्र , गोविंद फोटो व्हिडिओ, नक्षत्रा प्रिंटस ,या ठिकाणी नावा नोंदणी करावे असे आवाहन क्षी कुडलेक्षर मॉनिग वॉक ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

# लोकप्रशासन विभागाची रुग्ण सेवा मंडळ देगलूर येथे अभ्यास भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**




बिलोली तालुक्यातील मौजे शंकरनगर येथील श्री मधुकरराव बापूराव पाटील खतगावकर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ शिवाजीराव पाटोदे यांच्या मार्गदर्शनाखाली या अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने बी.ए. च्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवी संस्थांचे प्रशासन हा पेपर अभ्यासासाठी ठेवलेला आहे. या पेपरच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी स्वयंसेवी संस्थेला भेट देऊन त्यावर प्रकल्प लेखन करणे अपेक्षित आहे, या दृष्टीने देगलूर येथील प्रसिद्ध असलेल्या रुग्णसेवा मंडळास विद्यार्थ्यांनी अभ्यास भेट दिली. याप्रसंगी रुग्णसेवा मंडळात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे हे आयोजन केले होते. देगलूर महाविद्यालय देगलूर येथील लोकप्रशासन विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व श्री मधुकरराव बापूराव पाटील खतगावकर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या नेत्र तपासणी शिबिराचे उद्धाटन डॉ. शंकर लेखणे यांनी केले, यावेळी त्यांनी आरोग्यदायी समाजासाठी रुग्णसेवा मंडळाची भूमिका किती महत्त्वाची असते या अनुषंगाने मत व्यक्त केले, त्याचबरोबर सामाजिक जबाबदारी व कर्तव्याच्या भावनेतून स्वयंसेवी संस्थांची भूमिका समाज विकासासाठी कशी उपयुक्त असते हेही त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून सांगितले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष रुग्णसेवा मंडळाचे उपाध्यक्ष मा. सूर्यकांतजी नारलावार हे होते त्यांनीही विद्यार्थ्यांना मौलिक माहिती देऊन मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ उपस्थित होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन केले, विद्यार्थ्यांना अशा प्रकल्प भेटी किती उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात हे सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक रुग्ण सेवा मंडळाचे सह सचिव डॉ बालाजी कतुरवार यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रा ज्ञानेश्वर कोकणे यांच्यासोबत रुग्ण सेवा मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती करून घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संजय देबडे यांनी केले.तर श्री विठ्ठल चिंतावार यांनी उपस्थितांचेआभार मानले.

# मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे वाजले की बारा; निकृष्ट दर्जाचे काम असल्याचे माजी मंत्रीने केले फेसबुकवर सेंड

## खैरदी कार्यकारी अभियंता आहे की सेटलमेंट बादशाह; निकृष्ट दर्जाचे कामे करणाऱ्यांना अभय कोणाचे?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा । इस्माईल महेबूब शेख**

लातूर जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो) श्री.ए.ए.खैरदी यांनी संबंधित कंत्राटदार यांच्या संगनमतानेच निकृष्ट दर्जाचे कामे केले असून रस्त्याचे कामे हे जनतेच्या विकासासाठी आहे की गुत्तेदार पोसण्यासाठी आहे असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. कार्यकारी अभियंता (प्रमंग्रासयो) श्री.ए.ए.खैरदी हे अधिकारी आहेत का सेटलमेंट बादशाह अशी जनतेतून चर्चा होत आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून छोटे छोटे गाव गावाला जोडण्याचा शासनाचा हेतू चांगला आहे पण संबंधित कंत्राटदाराने मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून अतिशय निकृष्ट दर्जाचे कामे करीत असल्याने लाखो रुपये खर्चून मजबुतीकरण केलेल्या रस्त्याचे बारा वाजले पुढे पुढे काम चालू आणि मागे मागे केलेला काम उखडत असल्यामुळे मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे बारा वाजले की काय अशी चर्चा जनतेतून होत आहेमुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून लातूर तालुक्यातील आर्वी – नांदगाव – रायवाडी – साई – आरजखेडा दरम्यान सुरू असलेले रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रारी संबंधित गावच्या नागरिकांनी केले आहे. ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीची दखल घेऊन सदरील रस्त्यांच्या मंजूर निविदेत नमूद असलेल्या तरतुदीनुसार कंत्राटदाराकडून दर्जेदार पद्धतीने वेळेत काम करून घेण्यासाठी संबंधित खात्याचे अधिकारी लक्ष घालतील अशी अपेक्षा माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सदर पोस्ट फेसबुक वर अपलोड करून तक्रारीची दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी अशी अपेक्षा केली आहे.रामा २३८ ते देवणी तालुक्यातील हसनाळ इजीमा ६५ ते कर्नाटक राज्य सरहद्द या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्त्याचे झालेले काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले आहे. साईड शोल्डर च्या कामात काळी माती युक्त मुरूम वापरण्यात आलेले आहे. अंदाजपत्रका प्रमाणे प्रॉपर हार्ड मुरूम वापरलेले नाही. अंदाजपत्रकात नेमून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करण्यात आले आहे. ऋब्इ ची जाडी व रुंदी कमी करण्यात आली आहे. थचच् जाडी कमी करण्यात आली आहे व ग्रेडेशन प्रमाणे करण्यात आले नाही डांबर कामामध्ये जाडी कमी करण्यात आली आहे व त्यामध्ये डांबर चा प्रमाण कमी आहे. अशी तक्रार अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समितीचे संस्थापक अध्यक्ष सौदागर महमदरफी यांनी देऊन सर्व मुद्द्यांचा गांभीर्यपूर्वक विचार करून संबंधित दोषी ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कारवाई करावी अंदाजपत्रकानुसार कोणतेही मापदंड वापरण्यात आले नाही या प्रकरणात भ्रष्टाचार झाला आहे. त्याची चौकशी करून संबंधित कंत्राटदारासहित त्यावर सुपरव्हिजन करणाऱ्या शाखा अभियंत्यावर कार्यवाही करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असे निवेदनात नमूद केले आहे.

# शिवाजी विद्यालय चातारी येथे यशवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व स्नेहसंमेलन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

:श्री शिवाजी विद्यालय चातारी येथे सन २००३-४ मध्ये ८ वर्ग पास झालेले माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या आदर्श गुरूच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून शिक्षकांचा सत्कार या स्नेहसंमेलना २०२५ दरम्यान केला. तसेच या यशस्वी माजी विद्यार्थ्यांचा विद्यालयाकडून गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष. सुरेशराव कदम तर प्रमुख मार्गदर्शक डॉ . विजयराव माने,अँड अर्चनाताई माने,विश्वंभर वानखेडे, किशोर भारती, चिंचोलकर सर, शिवानंद बिच्चेवार,विजय लंकलवाड,प्रवीण सूर्यवंशी, मुख्याध्यापक हरी खोकले, उपस्थित होते. ७० वर्षापुर्वी ही शाळा ग्रामीण भागात शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी स्व. भाऊसाहेब माने यांनी स्थापन केली आणि आजही तीच भूमिका पार पाडत आहे. जेव्हा हे विद्यालय सुरू झाले, तेव्हा शिक्षण मिळवणे हेच एक मोठे आव्हान होते. आज सर्वत्र शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे, पण तंत्रज्ञानाच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धेत टिकून राहणे कठीण होत आहे, जग वेगाने बदलत आहे. सध्या स्पर्धेचे जग असून विद्यार्थ्यांना सर्वच क्षेत्रात स्पर्धा पार पाडावी लागते. स्पर्धेमध्ये विद्यार्थी टिकण्यासाठी कोडींग, रोबोटिक्स, ३ऊप्रिंटिंग, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) या तंत्रज्ञानांमध्ये शालेय विद्यार्थांना देखील कौशल्य हस्तगत असणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे अनेक मोठ्या शहरांतील शाळा देखील अशा प्रयोगशाळा आणि प्रशिक्षण देण्यात अपयशी ठरत आहेत. परंतु श्री शिवाजी विद्यालय आणि तेजमल गांधी विद्यालय यांच्या दूरदृष्टीमुळे, कोणत्याही मोठ्या शासकीय आर्थिक पाठबळाशिवाय, अशा स्टीम प्रयोगशाळा आपल्या विद्यार्थ्यांसाठी या वर्षी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मत डॉ. विजयराव माने



यांनी आपल्या प्रमुख मागदर्शनातुन व्यक्त केले. या प्रयोगशाळेत विद्यार्थी प्रत्यक्ष कोडींग शिकतील, रोबोट तयार करतील, नवनवीन प्रकल्पांवर काम करतील आणि आधुनिक जगाच्या मागण्यांसाठी स्वतःला तयार करू भविष्यात महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करतांना या बालवयात हस्तगत केलेल्या तांत्रिक कौशल्याचा मजबूत पाया निश्चितच स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये यश संपादन करण्यास मदत होईल, यामुळे भविष्यात त्यांना मोठ्या शहरांत शिक्षण व नोकरीच्या आणि रोजगाराच्या चांगल्या संधी मिळवण्यासाठी मदत होईल.तसेच हा बदल घडवण्यासाठी सर्वच माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याची गरज असल्याने माजी विद्यार्थी म्हणून यात योगदान देऊन आर्थिक मदत, मार्गदर्शन, किंवा शक्य असेल त्या सेवा उपलब्ध करून देण्याची व कोणत्याही स्वरूपात त्यांनी सहभाग घ्यावा व या परिवर्तनात सामील होण्याचे आव्हान डॉ. माने यांनी या वेळी केले.
या प्रसंगी ४० ते ४५ माजी विद्यार्थ्यांनी हजेरी लाऊन यापैकी धनश्री बरडे, सारीका माने,

> शिवाजी विद्यालय चातारी व तेजमल गांधी विद्यालय ब्राह्मणगाव येथील शालेय विद्यार्थांना भविष्यात स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी कोडींग, रोबोटिक्स, ३ऊप्रिंटिंग, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) च्या प्रयोगशाळा उभारून तंत्रज्ञानाचे कौशल्य हस्तगत होणार.
> -डॉ.विजय माने
> चेअरमन श्री शिवाजी माध्यमिक आणि कनिष्ठ विद्यालय.

वैजयन्ती कदम, प्रियका गांवडे, राम कदम, मनिषा सुर्यवंशी यांनी शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केल्या कार्यक्रमाचे संचलन जीवन रणविर यांनी प्रास्ताविक राम कदम.यांनी तर सर्वाचे आभार अभिजित देवसरकर यांनी मांडले.

# विरशैव लिंगायत समाजातील वेगवेगळया क्षेत्रातील समाज बांधवाचा सत्कार






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । प्रतिनिधी**

दिनांक १८ मार्च २०२५ रोजी देगलूर येथील सद्गुरु बंडयप्पा स्वामी मठ संस्थान येथे महात्मा बसवेश्वर विचारमंच शाखा देगलूर आयोजीत विरशैव लिंगायत समाजातील वेगवेगळया क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या समाज बांधवाचा सत्कार समारंभ सोहळा पार पडला.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस राज्य कार्याध्यक्ष दिव्यांग सेल रामदास पाटील सुमठाणकर यांनी समाज बांधवास संबोधित केले.
यावेळी सत्कारमूर्ती यादवराव देशमुख हिप्परगेकर (सभापती कृ.उ.बा.स. देगलूर) . संतोष पाटील येरगीकर (सरपंच, ग्रा.पं. कार्यालय चालुक्य कालीन नगरी, येरगी),.प्रा.डॉ. रविंद्र वैजनाथराव बेंबरे (वै. धुंडा महाराज महाविद्यालय, देगलूर), अशोक मजगे (शिवा संघटना जिल्हाध्यक्ष नांदेड ), सुभाष पाटील चैनपूरकर (अध्यक्ष शिवा संघटना, देगलूर),. उमेश मुदखेडे (सी.डी.पी. देगलूर), संजयआप्पा स्वामी जुक्कलकर, उमाकांत बसलिंगआप्पा सुलफुले (सेवानिवृत्ती भारतीय सैनिक), गणेश सुभाषराव हुस्से (पी.ओ. महाराष्ट्र ग्रामीण बँक) यांचा मान्यवरांचा महात्मा बसवेश्वर विचारमंच शाखा देगलूर च्या वतीने सत्कार समारंभ सोहळा पार पडला.यावेळी डॉ. जनार्धन भूमे अनिल पाटील खानापूरकर, मा पोलीस पाटील शंकरराव पाटील, महादेव माका , अरुण पाटील , तारकांत पाटील, देशमुख सर, सुभाष पाटील , , अक्षय पाटील, बेंबरे सर, सचिन पाटील करेगावकर, सुभाष पाटील ,मा द्याडे अप्पा, शिवानणंद स्वामी , देगलूरकर , बसवंत हलदे , वैजनाथराव मिसे रुपेश पाटील ,संजय लगडे हेडडे ,संजय स्वामी साई, आकाश रोटे, अशोक पाटील औरदकर रामशेटे भोकसखेडकर, संतोष आगलावे , संतोष मनधरणे, हुसे , गोपचेडे सुलफुले माळशेटे, आमटे , रावांगावे , रावणगांवकर शंकर काळे आणि सर्व देगलूर परिसरातील वीरशिव लिंगायत समाज बांधव आणि महात्मा बसवेश्वर विचारमंच चे सर्व पदाधिकारी उपस्थीत होते.या सर्व कार्यक्रमाचे सूत्र संचालन श चंद्रशेखर लगडे यांनी केले.

# मालपाणी मतिमंद विद्यालयाच्या आरोग्य शिबीरास पहिल्याच दिवशी मोठा प्रतिसाद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील**

नांदेड दि.२० मार्च २०२५ गुरूवार रोजी मुंबई येथील जय वकील फांउडेशन अँड रिसर्च सेंटर, बि.जे.वाडिया चिल्ड्रेन्स हॉस्पिटल, एसआरसीसी चिल्ड्रेन्स हॉस्पिटल व राजस्थानी एज्युकेशन सोसायटी नांदेड च्या वतीने आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या मेंदूविकार असणाऱ्या मुला-मुलींच्या रौप्यमहोत्सवी आरोग्य शिबिरास गुरुवार दि. २० मार्च रोजी प्रारंभ झाला. तीन दिवस चालणाऱ्या या आरोग्य शिबिरासाठी मुंबई येथील तब्बल ३५ तज्ञ डॉक्टरांची टिम दाखल झाली आहे. यावेळीही आरोग्य शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला असून जि.प. चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदिप माळोदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता कैलास मोरे यांनी भेट देत सातत्यपूर्ण चालणाऱ्या या उपक्रमाची प्रशंसा केली आहे.
आरोग्य शिबिरात तपासणी व उपचारासाठी मराठवाडा, विदर्भ, आंध्रप्रदेश, कर्नाटक आदी राज्यातून रुग्ण येतात. रुग्ण व त्यांच्या समवेत आलेल्या नातेवाईकांची गैरसोय होऊ नये यासाठी राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी,



सचिव प्रकाश मालपाणी, कोषाध्यक्ष जयप्रकाश काबरा, सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज, बनारसीदास अग्रवाल व मूख्याध्यापक नितीन निर्मल शिबीर स्थळी पूर्णवेळ उपस्थित आहेत.आरोग्य शिबीरातील रूग्णांवर प्रसिध्द बालमस्तिष्करोग तज्ञ डॉ. अविनाश सानप, डॉ. काव्या राजाराजन, डॉ. दिपमाला पांडे, डॉ. अवि शाह व डॉ. आशा चिटणीससह पस्तीस तज्ञ डॉक्टरांची टीम आरोग्य शिबिरात रुग्णांची तपासणी व उपचार करीत आहेत. आरोग्य शिबिरात तपासणी केलेल्या रुग्णांना सहा महिन्यांची म्हणजेच आगामी आरोग्य शिबिरापर्यंतची मोफत औषधी देण्यात येते. आरोग्य शिबीर यशस्वी व्हावे यासाठी संस्था पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मूख्याध्यापक नितीन निर्मल, वसतीगृह अधीक्षक संजय शिंदे व आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालय व श्री रामप्रताप मालपाणी मूक बधिर विद्यालयाचे कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# देवाच्या आळंदीत तृतीयपंथीयांच्या वतीने रंगपंचमी उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इम्रान हकीम**

महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल, महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी सुरक्षा दल यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्हा अध्यक्ष संतोषभाऊ सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आपुलकी वृद्धाश्रम आळंदी येथे तृतीयपंथी सुरक्षा दल आळंदी शहराच्या वतीने,फळ व स्वीट पदार्थ वाटप करून त्यांच्यासोबत रंगपंचमी उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन आळंदी शहराध्यक्षा प्रज्ञा गरड,उपाध्यक्षः योगिता गनमोठे, सचिव, स्वाती आहेर,आकांक्षा गायकवाड,उषा सातपुते,आरोही पवार,किरण दहिफळे,आदिती सावंत,पल्लवी कांबळे,अलका ठाकर यांनी केले.

# वडिल गोपालसिंह ठाकूर यांचे मरणोपरांत नेत्रदान करून धर्मभूषण अ‍ॅड.दिलीप ठाकूर यांनी समाजाला नविन दिशा दिली

## गोपालसिंह भैय्या यांच्या अंत्ययात्रेत मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतम बनसोडे**

सोमवारी संध्याकाळी एसटी कर्मचारी संघटनेचे माजी अध्यक्ष गोपालसिंह यांचे निधन झाले. दिलीप ठाकूर यांनी डॉ.चव्हाण, प्रगती निलपत्रेवार यांच्याशी नेत्रदानासाठी संपर्क साधला. कोणाच्या तरी आयुष्यात प्रकाश पडावा यासाठी नेत्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली. एवढ्या वयस्क व्यक्तीचे नेत्रदान करण्याची पहिलीच वेळ असल्यामुळे शंकरराव चव्हाण रुग्णालय विष्णुपुरी येथील तज्ञ डॉक्टरांनी ६ तासाच्या आत नेत्र काढण्याचे सोपस्कार पूर्ण





केले.मंगळवारी संध्याकाळी मिल रोड येथील निवासस्थानापासून निघालेल्या अंत्ययात्रेत अनेकजन सामील झाले होते. राजेशसिंह यांनी मुखाग्नी दिला. त्यानंतर झालेल्या शोकसभेत प्रवीण साले, कामगार नेते डी.आर. पाटील, ड. सी.बी.दागडिया, कल्याणसिंह काथी, शशिकांत भुसेवाड, रमेश डागा , सुरेश लोट, रामेश्वर वाघमारे, ड. प्रशांत अवधीया यांनी आपल्या भाषणातून गोपालसिंह यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.ड. दिलीप ठाकूर, दीपकसिंह, दिनेशसिंह, राजेशसिंह यांचे सांत्वन केले. विविध राजकीय, सामाजिक संघटनाचे पदाधिकारी, एसटी कर्मचारी व अधिकारी,पत्रकार,मिलरोड परिसरातील नागरिक, मित्र परिवार व आप्तेष्ट यांच्या सह मोठ्या संख्येत जनसमुदाय उपस्थित होते.वय झालेल्या व्यक्तींचे नेत्रदान करता येत नाही हा जो समाजात गैरसमज होता. तो ठाकूर कुटुंबाच्या पुढाकारातून दूर होईल असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला.

# अर्धापूर ते नांदेड राष्ट्रीय महामार्गावर एका महिन्यात ६ अपघातात ८ जणांचा मृत्यू तर ३० जण गंभीर जखमी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

अर्धापूर दि.१८ (ता.प्र.) अर्धापूर तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर मागील एका महिन्यांपासून अपघाताचे प्रमाण वाढले आहे.एका महिन्यात ६ अपघातात ८ जणांचा मृत्यू तर ३० जण गंभीर जखमी झाले आहेत.अर्धापूर तालुक्यातील रस्त्यावर दररोज किरकोळ एक ते दोन अपघात होतात.किरकोळ अपघाताची कोणी नोंद पण करीत नाहीत.या अपघातातून सुखरूप वाचलो म्हणून देवाचे आभार मानून दवाखान्यात किंवा घरी निघून जातात.अर्धापूर तालुक्यातील राष्ट्रीय महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी मुख्य रस्त्याला जोडणा-या रस्त्यावर व राष्ट्रीय महामार्गावर गतिरोधक बसवा.या मागणीचे निवेदन पत्रकार संघाच्या वतिने जिल्हाधिकारी नांदेड यांना तहसीलदार, अर्धापूर मार्फत मंगळवारी (ता.१८) निवेदन देण्यात आले.
अर्धापूर तालुक्यातून तीन राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व जिल्हा प्रमुख मार्ग गेले आहेत.या महामार्गावरून जड वाहने, प्रवासी वाहतूक, मालवाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या खूप मोठी आहे.दररोज वाहतुकीची वर्दळ जास्त असल्याने अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढले आहे.हा एक चिंतेचा विषय झाला आहे. मागणी एका महिन्यात




६ अपघातात ८ जणांचा मृत्यू तर ३० जण गंभीर जखमी झाले आहेत.अर्धापूर ते नांदेड राष्ट्रीय महामार्गावर अपघाताच्या घटना कमी करण्यासाठी १. वेग मर्यादा फलक व सुचना फलक लावने, २. गावातून मुख्य रस्त्याला जोडणा-या रस्त्यावर गतिरोधक बसविणे, ३. राष्ट्रीय महामार्गावर आवश्यक त्या ठिकाणी गतिरोधक बसविणे, ४. विरूध्द दिशेने येणाऱ्या वाहतूकीला आळा घालने, ५. महामार्गावरील धाबे, हॉटेल, पेट्रोल पंप चालकांनी वाहने थांबविण्यासाठी वाहनतळाची व्यवस्था करणे, ६. अपघातग्रस्तांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी अर्धापूर येथे ट्रोमा सेंटर उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करून शासनाला पाठविणे, ७. वाहतूकीचे नियम, वाहन चालकांची वैद्यकीय तपासणी, वाहनांची तपासणी आदी उपाययोजना करण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेशीत करण्यात यावे.या मागणीचे निवेदन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतिने जिल्हाधिकारी नांदेड यांना तहसीलदार रेणूकादास देवणीकर, अर्धापूर मार्फत देण्यात आले.या निवेदनावर नांदेड जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत मुळे, अर्धापूर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष गुणवंत विरकर यांच्या स्वाक्षरी आहेत.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904